म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. नं. २०९८

# मानिनी.

## ( ऐतिहासिक काव्य. )

कवि

"वसन्तविहार."

[ किंमत ३ आणे. ]

REFBK-0019521
REFBK-0019521

# प्रास्ताविक दोन शब्द.

[ गीति. ]

कोराने-कुलभूषण-भीम-लिखित-मानिनी-कथा-सारा ॥
प्रथमा वेषावरि, कवि, लेवावि तिजकरविं या अलंकारां ॥

वसन्तविहार.

REFBK-0019521

ॐ

...नीं काव्य.

...त्त-गीति.

-०*०-

... यमुनेच्या शीतल प्रवाहांत
आतां करील मज्जन वाटे, धरवे न धीर दाहांत
वासरभर आक्रमुनी गगन-पथत्रस्त होय तो सविता
तोषवि तामरसां जो लोक रसिक रुचि तदीय हो कविता
कांचनमय कर त्याचे प्रतिबिंबित होति जेधवां नीरीं
केला जणुं परिधानचि यमुनेनें कृष्णशालु सोनेरी
रमणीय वसंत अहा त्याची संध्या कशी न रमणीया
गातां कोकिल-कांता वाटे गंधर्व-लोक-रमणी या
मंद सुगंधित शीतल वायूच्या सुखविती मना लहरी
किंवा क्रीडति गोपी त्या, तो वृंदावनांत बाल-हरी
हंसती प्रसून-कलिका-चित्र-मयूरी समीरघन वळला,
पुष्पांच्या मधुगंधें यमुनेचा सत्प्रदेश दरवळला
वनदेवी सुर-सरिता-नीरीं करितां सहास्य जलकेली
उटणीं सुंदर सुंदर अंगींचीं जीं धुवोनि जलिं गेलीं-
त्यांचा परिमल ऐसा किंवा मलयानिल-स्वभाव-बल
कीं सृष्टि मंत्र घाली प्रभु अपुलासा करावया शबल

सेवित होते कांहीं कलहंस सरोवरांत बिस–तंतू
कांहीं कीडत होते लेखित अन्या खगांसि लघु–जंतू
कोणी नौकेमाजीं करिति विलासी विहार कासारीं
परि दैवाचीं कृत्यें नसतीं सर्वत्र सारखीं सारीं
या समयीं इतिहास–प्रथित उदेपुर–गताद्रि–पायांशीं
घन तरुवृंदामाजीं उटज–निकट–आम्रवृक्षरायाशीं
टेंकुनि उभी सचिंता बाला वय जीस वर्ष सोळावें
अलकावती–स्त्रियागण सौंदर्यें यत्पदाब्ज लोळावें
तरुणी बहु संतप्ता रक्तोत्पल कीं असें वदन शंका
कीं ही अनलज्वाला जाळी कोण्या नरासि सकलंका
मानीपणा तिचा जो तेज म्हणूं कीं अहा विलक्षण तें
रंगच्छटा प्रगटवी यंत्र असे कीं गमे क्षणक्षण तें
बोले स्वगत तिचे ते बोल सुगंभीर वीर–वाणी ती
रजपूत कुमारी ती शौर्य तिचें धीर वीर वानीती
" रजपूतवंशजातें कृत्य असें कोणतें अशक्य जनीं ?
रजनीचा दिवस करिन दिवसाची मी क्षणामधें रजनी
क्षणहि न सहवे नीचें लावियला जो कुळास डाग मला
रजपूत वंश निर्बल त्या जंबूकासि–बेरडा–गमला

वधिलें मत्तातातें लत्ता त्याच्या उरांत हाणीन
रजपूत सिंहकर्णी " अपमान " अशी ठरचि वाणी न
घेइन सूड त्याचा, राहिल सोशीत काय अपमाना
ही मानिनी असें जों. लवल्या जरि मत्पदींहि नृपमाना "
ऐसें म्हणोनि सोडी दीर्घतर श्वास पाहुनी वरती
जणुं जागवि दिक्पतिगण विनवुनि देवास घेइ कीं वर ती
झाली विवेक-मग्ना बाला वदनीं दिसे दुजा रंग
पाहुनि यन्नयनांना तटस्थ होती वनांत सारंग

२

देश कलिंग तयाचा स्वामी जो कृष्ण-सिंह तत्कन्या
ही मानिनी अनन्या अन्या इजसम न जाहली धन्या
यवनपती कृष्णहृदय अल्लाउद्दीन ज्यास अभिधान
दुष्कृत्यांचें केवळ या लोकींचें खरोखर निधान
एक्या रात्रीं अवचित छापा घालुनि गडांत शिरलाहो
यन्मति वांछी केवळ शत्रूचें निज करांत शिर लाहो
निद्रावश कृष्ण--हरी पाहुनि चालवि निजासि त्यावरती
दिग्देवता अदृश्या गेल्या घेउनि तदा नृपा वरती
" हा नीचा निर्लज्जा बालिश कृति ही तुझी तुला शोभे
कैसें अम्हां न कथिलें वधिलें भूपा कशाचिया लोभें

निद्रिस्ताशीं जागा. निःशस्त्राशीं करी न रण शस्त्री,
हें समुचित नच वीरा, नतरी मिळवी क्षणीं रणयश स्त्री
यापरि बोले सेना खचला आधार, मानसीं भ्याली
ती भेक-पंक्ति केवळ, तद्रिपुसेना तयांसि हो व्याली
लुटिलें धन जन नीचें त्यांत स्त्रीरत्न लुटियलें हाय !
काय बघोनि रतीचा वेडा झाला क्षणामधें राय
त्यासमयीं या रत्नासम नव्हतें रत्न या महीवरती
दुर्गावती असें तें रत्न वरी कृष्ण-हरि–महीवर ती
ह्या रत्ना पळवाया रचिला हा व्यूह सर्व यवनानें
भुलला कुरंग गीतिस किंवा तो रसिक लुब्ध कवनानें
नृप कृष्ण—सिंह त्याची सेना पाहोनि तेंवि भयभीता
या मानिनीस होती दासी जी इंदिरा सुकवि—गीता
कृष्ण—हरीचे प्रेमळ घेउनि जन आपुल्या सवें तीनें
विपदेसि—राक्षसीतें--चिरिलें निजबुद्धिनें—सुहेतीनें
ती भूगर्भपथानें तेथुनियां मानिनीसह पळाली
उपरि कथित उटजांतरिं गुप्तपणें इंदिरा सहज आली
जनक मरण जननी छळ जाळिति हे अनल-गोल हृदयाला
त्या मानिनी-सुदतिच्या नयनीं सहज अश्रबिंदु आजि आला

पडला कोमल गालीं पद्मदलीं बिंदु नव दंवाचा हो
हंसातें मति सांगे सेवुनियां सौख्यलवद वांचा हो
आला श्रवणीं तीच्या तुरगांचा चरणनाद लवलाहे
भोंवति भिरिभिरि पाहे तों रिपुचें सैन्य निकट येताहे
लढले धनिनीसाठीं होत जे निकट--वार्ति जन तीचे
ते स्वामिभक्त पाहुनि चकित स्वर्गांत जन सुरपतीचे
ते यवनहि चतुर अती त्यांशीं लढणार तेहि चतुरतर
दिपविति सहज विपक्षा रणदेवी सहज देइ ज्यांस वर
हा ! हा ! कृष्णहरांचे जन थोडे यवन --सैन्य सागरसे
ती मानिनीहि लढली, परि अबला विनवि ' युक्ति सांग रसे"
परि विजयी यवनरणीं गेले घेवोनि मानिनीला ते
हरिलें त्या चोरानीं, प्रेमें कविसंघ वानि, नीलातें;
दासी चतुरा धीरा ढाळित बसली न, इंदिरा असुं ती,
धनिनी मुक्त कशी हो तर्क करी गणि न आपुले असु ती
युक्ति सुचे सहज तिला, युक्ति न ती दूति हो यशाची ती
गेली निघोनि तेथुनि कीं भावी कार्य–लेख वाची ती

३

प्रियपति–रविपथ पाहे परिहित–पीतांबरा क्षमा राणी
प्रेमप्रसन्नमुद्रा पाहे द्विजवृंद साक्ष मा रानीं

गाती स्तुतिपाठ नवे रविरायाचे सुभाट गमतात
ज्यांच्या मंजुल नादीं मोहुनि वनिं बहु कुरंग रमतात
स्पर्शे सुखवी अपुल्या मंदसुगंधित समीर सर्वाला
हा पवनानंद हरी नंदन-वन-गत जन-प्रगर्वाला
रम्य अशा समयीं या राणी दुर्गावती वराक्षी ती
यवनप्रासादाच्या होति उभी सुंदरा गवाक्षीं ती
ठेवुनि कर-तल कमलां शीतसुधाकर-सुरम्य-वदनाला
झाला अनंग बरवें, भ्रम न तरी बघुनि सत्य मदनाला
अवलोकीं उल्हासें बांधविलें नव तदर्थ उपवन तें
केली अपुली राणी यवनें रुचिलुब्ध होय नृपमन तें
अल्लाउद्दीन तिचा-देवीचा-दास जाहला पूर्ण
आज्ञा नुल्लंघी तिचि देहाचें होउ आपुल्या चूर्ण
राणीवशांत भडके मत्सर पावक यदा असा भाव
ठाउक उभयांस असें ज्ञानाचा जेंथ संतत अभाव
आज्ञा रायाची ही " राणी दुर्गावती वचा माना
जरि मानिलें न मज या उबगति उडवीन त्यांचिया माना "
भीती पारहि जीतें सिद्धहि दासी तिच्या सुसेवेतें
झेली वचना, पाळी रत्ना नृप, अर्पिलें न देवें तें

दा. क्र. १८५२९

भूपहि दास जिचा, परि होती राणी उदास संतत ती
श्रीपदिं असतें सुख तरि धरिते कां प्रभुपदांस संततता
चित्रविचित्र सुमींहि न कारंज्यांतिल नवा तुषारांनी
पद्मीं नव कुमुदीं नच न लताकुंजीं न पुष्प हारांनीं
लागेना सुख तिळही स्फटिक-सम-प्रभ-सुरम्य सदनांत
म्लानत्व दिसे हाहा क्षितिपतिसखिच्या मृगांक-वदनांत
तों अश्रुबिंदु आले नयनांतुनि दोन मौक्तिकें नव तीं
तों भास होय अपुल्या ठेवियले कर कुणी गळ्या भवतीं
पाहे वळोनि मागें दचकुनि तो मूर्तिमान् उभा यवन
अल्लाउद्दीन अहा लावण्य जिचें तयास हो कवन
" हृन्मानसहंसीच्या युवराज्ञीच्या कशास नयनीं या
हे अश्रुबिंदु यावे श्रमली ही तनु-लता सुकमनीया
रागजली कशी ही कां बोलेना अजून ही राणी
प्रेमें पूज्य मला जी भूषविली जीस दिव्य हीरांनीं
मत्प्रेमा, मल्लक्ष्मी, मद्राज्य, तुला न कां रुचे पूर्ण
वद हे सुवर्ण—लतिके दास पदीं सिद्ध हा असे तूर्ण "
" माझ्या मनींहि नव्हतें हें असलें मनिं नव्हाच शंकित हो
हे अश्रु-बिंदु फोल न, पण अपुली मी सदाच अंकित हो "

" तूं बोल बोल ललिते कां अशि भीतेसि भीरुपरि लोकीं,
मंदार गेहिं आणिन, सागरिं फेकीन विंध्य अवलोकीं
नंदनवन बनविन गे उपवन हेंही त्वदर्थ मृदुलांगे
'पण' काय चारुगात्री बोल गिरा तव मनास मृदु लागे
" हें आपणास माहित, कीं आहे माननी अशा नांवें
कन्या एक मला जनिं, यश जीचें सुखशांत वानावें
मी या सुखांत, पण ती मत्प्रिय कन्या कुठें असेल वनीं
करिते काय न कळतें, धुंडित कां राहिली असे अवनीं
मातृप्रेम कठिण बहु, तिजसाठीं हृदय खास कळकळतें
पण हाय ! हाय !, देवा ! अनुभव ज्याला तयास कळ कळते
" केवळ पणें तुझ्या या समजावें काय काय सांग मला
येथें तिज आणावें हेतु तुझा, दास पर कसा गमला "
" इतुकाच हेतु माझा याविण तो अन्य काय असणार
पुरवा कथितें हंसा या माझ्या मानसांत वसणार "
" ठीक तिला शोधाया आणाया धाडितों सखे जन मी
चिंता कां करिसि अशी तूं माझें कीं तुझेंहि रंजन मी"
ती यवनाची मुद्रा हास्यहि तें त्यांत नयन-चंचलता
त्या धूर्त चित्तभूमित उद्भवली जणुं दुजी विवेकलता

"कीं आयास न करितां हरिणी आली कुळांत अन्या ही
या आनंदासम नच भूषण त्या इंद्रचित्तजन्याही
मान्या युवरायाला दुर्गावतिपरिच मानिनी असली"
धाडियले निज लोका सांगुनि "आणा असे कुठे वसली"
कळलें असेल रसिकां जयजयकारें हरोनिया रत्न
गेले जे जन ते हें पुनरपि सांगावया नको यत्न

४

लागे रिपु–करिं–दीना अंतरिं ही मानिनी सुविमला जी
मंदार–पुष्प–कलिके लाजवि सोडोनिया परिमला जी
"झालें हेंही बरवें" ऐसें निजमानसांत मानीच
"नकळे व्यसनीं लोटुनि करितिल विट ते विटंबना नीच
निश्चय बहु दृढ करुनी होवो होणार या जगांतरिं तें
हरितें चिंता माझी ज्याचें यश हो न भक्त गात रितें
धर्मांतर न करीं मी माझा धर्मावरि सुविश्वास
धर्मचि तारी मनुजा यत्तेजें सोडितो रवि श्वास"
आली प्रासादीं ती कुशल प्रश्नीं तिला विचारोनि
पाहे यवन मधुरशा पक्वान्नमिषें विषासि चारोनि
तो झाडोंझाड फिरे ती पानोंपान होति फिरलेली
व्यर्थ प्रयत्न त्याचे फसवी एणी वनांत शिरलेली

युवराज मानिनीच्या लावण्यें अद्वितीय वेडा हो
कादंबिनीस पाहुनि मयूर फोडी मृदुस्वरें टाहो
बसली सचिंत होती बाला ती वदत 'राम' हालांत
युवराजाची आली स्वारी परि तों तिच्या महालांत
आंठ्या पडल्या भाळीं त्यास पहातां तदा कुलवतीच्या
भडके द्वेषज्वाला हृदयींची त्या उणी न लव तीच्या
युवराज तिशीं बोले "कां असशी गे सचिंत कुंदरदे
चिंता योग्य न तनुला मृदुला जी हरिस मोह सुंदर दे"
"छे चिंता ती कसली पण या वेळीं इथें कुठें आलां
कां श्रमलां कां चुकलां पथ इतुकें प्रेम हें तरि कशाला
या प्रेमा मी दीना योग्य न तरि कां मदर्थ आलां हो
कां मज अभागिनीवर आगमनाचा प्रसाद झाला हो"
"मृदु-तनु–लतिके कैसें प्रेम तुजवरी बसे न कवणाचें
वेडा होइल तो हरि, सोडुनि रति, काम ही सरव नाचे
पाताळांतुनि या क्षणिं जरि वरती नाग–कन्यका आली
झिडकारिन मी तिज पण रंभा उतरे नभांतुनि खालीं"
शल्यें सललीं हृदयीं युवरायाचीं असह्य वचनें तीं
दावी भाव स्पष्टचि अपुला त्या आपुल्या प्रवचनें ती

"बाळगितां बहु कळकळ यास्तव मी आपलीहि ओशाळी
परि इच्छेपरि वर्तन करण्या जननी नसे मला व्याली"
"या भावी भूपाशीं—माझ्याशीं—चारुगात्र हंसाशीं
नाहींस काय लग्ना सिद्ध यवन-कुलशिरोवतंसाशीं"
"होय, नृपाल कधींही अपुली इच्छा न पूर्ण करणार
स्वर्ण-लता आम्राला सोडुनि कां बब्बुलासि वरणार?"
"हे मानिनी न हितकर याचा होई न चांग परिपाक
हा युवराज न सोडिल तप्त कराया स्वहेतु धरि धाक
मनिं नीट विचार जनीं करि देतों अवधि चार दिनरजनीं
ऐसें बोलत पाहत गेला ती काय बोनते रमणी
वाटे मनीं तयाच्या "जाते ही मानिनी कुठें आतां
नाहीं आज उद्यां तरि युवरायाच्या मिळेल या हातां
स्वस्थ कसा हा राहे मी अपुली करिन पट्टराणी ती
कितिसा उशीर मजला आलिंगाया लताकरांनीं ती"
झाला क्षण उठली कीं गेली तेथुनि निघोनि रामा ती
"लाविन लग्न असीसह थांब मला दाखवी विरामा ती
ही मानिनी नव्हे तरि घडलें नाहीं जरी असें कृत्य
रजपूत जो असे तो कधिं न चुके वच करावया सत्य

५

भंग्योचतटा स्पर्शुनि शरयू करि घोर नाद खळखळसा
वाहे स्वैरगतीनें प्रासादा घालुनि प्रबळ वळसा
झाली होती संध्या पूर्वेच्या सवतिशी रवी रमला
रजनी सांगे विधुला "आतां आला बरीक धीर मला
आराम वाटिका नव–खग–कुळ–मंजुळ–रवांत मुरली ती
विविधलता व्रजवनिता वायु हरी वाजवी सुमुरली ती
सरितेच्या सत्पुलिनी कांहीं नीरीं बसोनिया द्विजते
देउनि अर्घ्यं रविला होते संध्या करीत कीं द्विज ते
अवलोकित सौंदर्या बसली ही मानिनी तिथें आली
दुर्गावती तदा ती कृत्येची मूर्तिमान् गमे आली
कोपें वदे मुलीला "मानिनि किति घोर कृत्य अपमान
युवरायाचा केला त्वां तव उडवील खास नृप मान"
"रजपूतकुलकलंकित करिल असें घोर कृत्य हे माते
लोहपणा ये हा हा सत्यचि बावन कशीहि हेमातें"
"वदतेस काय मानिनि नीट सरळ बोल कां अशी स्वैर"
"माते सरळ वदतसें केलें मी कृत्य काय तें गैर"
"काय ह्मणुनि पुससि करुनि युवरायाचा बळेंचि अपमान
अशि उपजलीस तरि कशि वंशीं या तुज खरेंचि उपमा न"

" अपमान तोहि जाणुनि बुद्धि मदीया गमे मला सरला
मतज्ञानदर्पणावरि तिळहि नसे मळ कधींच ओसरला "
" हे मानिनी तुझ्याशीं वदतें तर मीच वाकुडें काय "
"सरळ वचन परि वक्रा.कृति-सरितेच्या जलीं बुडे काय"
" झालें तरि काय असें सरळ नसाया मदीय कृत्य तरी "
" त्वन्मानसदेवीतें पुस न मला तारि तुजसि सत्य तरी
अथवा विवेक दर्पणि वृत्तप्रतिबिंब पाहिं तव माते
किति निष्कलंक मोहक कळेल अनृत न गमेचि लव मातें "
" आलें कळोनि मानिनि यवनें महिषी जशीं मला केली
तेव्हांपासुनि ती तव तळव्याची आग मस्तका गेली "
" नीति गृहा लावियल्या अनलाचा ताप हो परांस जरी
त्यावरि उलट करावी दुर्वचनांगारवृष्टि काय तरी
घ्यावी सोसुनि कां ती हृदयींचा कोप कां न भडकावा
कुळ बुडतें नच कळतें जडवी व्यसनासि हा उघड कावा "
" त्वत्कल्पना नको मज शिकवावें काय गे तुवां वडिलां
सांपडल्यें तद्धातीं मरणभयें म्यां तया रुकार दिला "
आई तुजला ' आई ' ह्मणण्याची लाज वाटतें मातें
उपदेशावें कथिलें त्वां मज व्हायास कथिरु हेमातें

त्वा डाग लाविला गे रजपूतस्त्रीगणास या कृत्यें
पातिव्रत्याची त्वां रक्षा केलीस हाय हा कृत्यें
शुद्धप्रेमाची त्वां दुष्ट केलीस पायमल्ली ते
कळुनि वळुनि नकळें कां कवटाळिसि उग्र-गरल-वल्लीतें
सोडोनि राजहंसा न कळे कां भाळलीस बगळ्याला
केवळ कलंक न तुला लागे रजपूत त्यांस सगळ्याला
कोठें मोर कुठें तो वायस कोठें हिरा कुठें दगड
तद्वैभवास भुललिस नकळे कीं चटुल भाषणा रगड
होतें वैभव हरिपरि होतां तुज पति रतीश-सुंदरसा
सोडुनि सुधारसाला सुज्ञ न सेवी कधींहि कुंद–रसा
पतिहुनि रुचिरतर स्त्री परपुरुषाला विवाहिता न वरी
प्रेमधनहराची तूं पतिहंत्याचीहि होसि हा! नवरी
या त्वत्कृत्यश्रवणा टाळाया आप्त लोक ते दडती
पाहुनि पूर्वज नयनां लावुनिया पदर ढळढळा रडती"
घ.ली अंजन नयनीं बोले लावोनि जन्मदात्रीतें
ती मानिनी, तयाचें बीज न उमटे मुळीं कुपात्रीं तें
बोले उलट मुलीला "जरि वरिसी तूं स्वतां न युवराया
तो तव हाल करिल बहु नच सोडिल आत्महेतु पुरवाया"

" ते हाल काय केवळ पण माझे प्राण घेतले माते !
ही सिंहाची कन्या सोडि न निज आर्य–धर्म–हेमातें
लावि न कलंक वंशा कल्पांतींही न हो यवन–दासी
अन्या न चातकी वश केवळ ती लीन होय वनदासी
आपण काक ह्मणोनी अन्य खगा गणुं नये तयें काक
किंवा बकासि द्यावी बकस्वरानें कशी परें हांक ?
यावच्चंद्रदिवाकर राहुनि अविवाहिता जगांतरिं मी
रजपूतवंशजाची कळकळ ऐशा नरोत्तमा वरिं मी
लावीन जंबियाशीं नाहीं तरि लग्न योग्य मज ना तें
जा नीच येथुनी तूं पाहुं न इच्छीं कलंक–वदनाते "

६

रजनीश सुधा किरणीं सिंची भूमीस दुग्धधारांनीं
तो व्योम-मंडलहि बहु मंडित होतें असंख्य तारांनीं
ज्योत्स्नाविहरत होती ज्योत्स्नेसंगें चकोर गगनांत
श्रवणमधुर बहु होतें चालत गायन विहंगम गणांत
ही सृष्टिसुंदरी वा अवतरली शांति काय मूर्तिमती
निद्रासुखार्थ केवळ वाटे ही होय काय मूर्ति मती
पर्यंकीं पहुडुनियां पाहत होती प्रवाह सरितेचा
पूर्वाभिमुखीं हर्म्यीं हरित हरीचा प्रगर्व हरितेचा

उद्यांनीं पुष्पांचा होता सौगंध बहुत दरवळा
" या मानिनीस सुखवूं " हेतु धरुनि चंद्र-कर-निकर वळला
शांत हृदय परि नव्हतें गहन विचारांत ती गढुन गेली
यन्मानस-कासारीं शत्रु-हनन कामना करित केली
क्षणिं हास्य लास्य करि तद्वदनसदनिं शांतिही तयासंगें
वाटे निश्चय झाला अढळचि हरिच्या न आयुधें भंगे
इतुक्यांत आंत शिरला द्वारें उघडोनि मंचकाजवळ
युवराज थेट आला सिंह-सुता भी न कुंजराजवळ
कोपे आंतुनि वरतुनि सुख होइल हास्य दावि त्या जेणें
बोले मधुर रवानें " इतुक्या रात्रीं कुठें इथें येणें
निजला असाल आपण सौख्यांत मना विवेक शिवला हो
मत्काय दर्शनसुखीं अमृतरसीं कीं तुम्हा भिजवला हो "
तो युवराय मधुपसा विटसा नटसा बराच रंगांत
बोले " ललिते तुजविण मज सुख–निद्रा न येइ सदनांत"
मनिं मानिनी वदे ती " हा मेल्या दाविसी कुणा छद्मा
घे सुख–निद्रा अक्षय धाडुनि देत्यें यमाचिया सद्मा"
निजहेतू साधाया बोले परि ती हंसोनि गालांत
" ते दिनिं अपराध घडे माझा जैं मंदिरासि आलांत

त्याची मज " तोंचि वदे "छे छे मी तुजासिं या सुकलिकेला
त्रासविलें दुःख दिलें वदलों टांकोनि मन्तु तव केला
यांची मला क्षमा कर याची हा दास दीन या चरणीं "
मूढ मधुर विश्रप जो शुद्धीं कैंची तदा तदाचरणीं
प्रेमातुर बहु झाला उठला उठवे न नेट अति केला
सरसावें आलिंगन द्याया सौंदर्य—पूर्ण—लतिकेला
झडकरि मागें सरली चपलेपरि सुदति हरिकिशोरी ती
युवरायास न कळलें झाली केव्हांच पाठमोरी ती
पदरीं लपवियला जो घेतियला जंबिया तिनें हातीं
युवरायाच्या हृदयीं मारियला धन्य हो कृति अहा ! ती
कांहीं करील गडबड तों शिरलें त्या गवाक्ष पंथानें
व्यक्तिद्वय लपलेलें देखियलें कृत्य हें सकल ज्यानें
त्यांतील एक बोले पट दूर करोनि आननावरिचें
" शाबास मानिनी त्वां रक्षियलें नांव गे पिता हरिचें "
ती मानिनी वदे मग आश्चर्यें पाहुनी तदा तिकडे
" तूं कोण इंदिरा कशि यावेळीं कोण हे दुजें इकडे ? "
" कैशी आलयें येथें हें सगळें मागुनी निवेदीन
संप्रति इतुकें कथियें हे युवनृप पुढती हो अरी दीन

हे तेजसिंह यांचे जयसिंह वडील देश मेवाड
करितात राज्य तेथें वर्णावें यद्यशा सुरें गाढ ”
तों मानिनी मनीं बहु लाजे पाहे सुसाह्य-कर्त्यास
सुचविति तैं ओष्ठ तिचे सांगावें कांहिं भावि भर्त्यास
ताडुनि युवराय वदे “ माझे जन असति जे उभे खालीं
उतरुनि गवाक्षपंथें चाला त्यांसह पुढें सवें आलीं
ती इंदिराहि आहे आलों मी भागुनी ससेन पहा
गांठावया तुह्मांला अजि हे आनंदपर्व होय महा ”
हें मानिनीस न रुचे कीं जावें पुढति एकटें कैसें
सोडोनि साह्यकर्त्या संकटिं दिसतें अयोग्य हें ऐसें
दे अनुमत मग जेव्हां दासी तीचीच इंदिरा तीतें
अनुसरली युवराया जाती घेवोनियां पदाती ते

७

तें यवनसैन्य गेलें, घेउनियां मानिनीस जयघोषीं
ती इंदिराहि गेली स्मरण सुरसिका असेल रसपोषीं
ती तेथोनि निघाली जयसिंगाच्या पुरा प्रथम आली
कीं कृष्णसिंहराणा त्याशीं त्याचीं सुसख्यता झाली
होता संबंध निकट जयसिंहहि तेजसिंह तनयार्थ
ती मान्य मागणी करि रायातें कृष्ण-सिंह-तनयार्थ

झाला विवाह असतां परि आलें दैव आड उभयांना
देवीं जें लिहिलें तें न चुके ब्रम्हादिकादि सुर यांना
ती इंदिरा नृपाला सांगे बहु मानिनी–गुणां आंगें
मानीपणा स्वधर्मश्रद्धा स्वकुलाभिमान जो जागे
रिपुचा सूड उगविण्या सांगे केली तिनें प्रतिज्ञा जी
परिसुनि जयसिंह सुता धाडी देवोनि सैन्य हो राजी
साह्यार्थ मानिनीच्या सादर आली मनांत अनुकंपा
त्या यवन–नीच–कृत्या परिसुनि पावें नृपाळतनु कंपा
झोटिंग बादशाही अल्लाउद्दीन–भूप–राज्यांत
हेरा करवीं कळली नंदी शोभे न भूप राजांत
" गारद त्यास करावा छापा घालुनि " मनांत युवराय
योजी पथ पाहे मग तत्प्रासादीं शिरावया जाय
दैवें गवाक्ष दिसलें उघडें त्या मानिनी–महालाचें
होते निशेंत परिचर फाल्गुन–मासांतले सुनट साचे
केला प्रवेश अंतरिं भाषण तों तेथ होय उभयांचें
परिसति मोठ्या कष्टें तों होय विदीर्ण हृदय यवनाचें
तों आंत शिरति दोघें असतां कांहीं प्रसंग ओढवला
त्या मानिनीवरति जरि होते सिद्धचि वधावयास खला
ती मानिनी सुकृत्यें रायाच्या उतरली कसाला हो

ग्रं. क्र. १९५२

शौर्यें पूज्य जहाली अधिकाधिक आवडे रसाला हो
छापा अवचित पडतां अल्लाउद्दीन लोक घाबरती
पळती सैरावैरा जी वाट फुटेल ती तदा धरती
लुटिलें नाहीं कांहीं, वधिलें नाहीं तया शरण आले
जे शस्त्ररहित झाले नृपललनातेंहि योग्य वागविलें
रजपूत–वंश–संभव युद्ध–धुरंधर तयास हें साजे
तो तेजसिंह त्याच्या नामाचा घोष सर्वदा गाजे
बहु शोधली परी ती राणी दुर्गावती न सांपडली
कोणी ह्मणे बळी ही राज–स्त्री–गण–सुमत्सरा पडली
राणी स्वतां उडी घे शरयूच्या निर्मल–प्रवाहांत
कोणी वदे असें ही झाली जोगीण पाप—दाहांत
कोणी कांहीं कोणी कांहीं लागे प्रकार सांगाया
इतुकेंचि सार केवळ सांपडली ती कदा न त्या राया
मग तेजसिंह गेला घेउनियां लोक राजधानीतें
चातुर्यें जन रक्षी सद्यश त्याचें न कोण वानी तें ?
त्या तेज–सिंह–हंसा अनुसरली मानिनी सु-हंसी ती
घाली माळा कंठीं अतुल प्रेमें कवि प्रशंसी ती
हार सुरहि सुमनांचे शिरिं वर्षति अप्सरोगणहि नाचे
पाहोनियां जनांचें सार्थक दत्तात्रयात्मज मनाचें १८०

ग्रंथ संग्रहालय
नं.
मा.
ठाणे

मुंबई—कांदेवाडी सदाशिव लेन कल्याण मोती चाळ
नं० २ येथें धी वैश्य प्रिंटिंग प्रेसमध्यें दत्तात्रय
काशिनाथ भिंगार्डे यांनीं छापिलें तें शंकर
दत्तात्रय जोशी यांनीं मुरारजी गोकुळ.
दास चाळ नं० ३ मुंबई नं० ४ येथें
प्रसिद्ध केलें

REFBK-0019521
REFBK-0019521